

# क्युबिकल्स

- आनंद माने

# क्युबिकल्स

आनंद माने

ई साहित्य प्रतिष्ठान

“ Cubicals”
ANAND MANE
Last Bench designs
9833844994
maneanand7@gmail.com

प्रकाशन :
ई साहित्य प्रतिष्ठान

e Sahity Pratishthan®
eleventh floor
eternity, G1102
eastern express highway
Thane. 400604
Ph : 9869674820

esahity@gmail.com
www.esahity.com
www.ednyaneshwari.com
http://etyarth.blogspot.in/
http://esahityapratishthan.blogspot.in/
www.marathiriyasat.com

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2012




प्रत्येक काळाची स्वतःची अशी एक खूण असते. ती खूण एकदम बॅंग स्पॉट करणं हेच मुळी एक जिनियस निधान असतं. मर्ढेकरांना नव्या मनुतील गिरिधर पुतळा काळ्या बंबाळ भट्टीच्या आगीसमोर सापडला. तर आनंद मानेंना क्युबिकल्समध्ये. या नव्या मनूची वेदना आणि संवेदना शार्प शब्दांतून व्यक्त करताना त्यांनी काहीच हातचं राखून ठेवलेलं नाही. त्यामुळे ती वेदना स्कालपेलसारखी खोलवर उमटते. शार्प. नेमकी. धारदार.

आनंदने या कविता वाचकांसाठी लिहीलेल्या नाहीत. मनोरंजनासाठी तर नाहीच नाही. कोणाला आवडाव्या म्हणून नाही. रहावत नाही म्हणून लिहील्या. या कविता एका दबलेल्या किंकाळीसारख्या आहेत. ज्यांना त्या कळतील त्यांनाच त्या 'कळ'तील. कदाचित भावतील. कदाचित प्रमाणाबाहेर.




"बेखुदीकी हदतक" घेऊन जातील.

ई साहित्य प्रतिष्ठान



-o- हा कविता संग्रह नव्हे ..
या कविता नाहीत..
-o- या पुस्तकातील व्यक्ती काल्पनिक असून
आपल्या आजूबाजूला आढळल्यास गैरसमज करुन न घेता
हा निव्वळ योगायोग मानावा.
-o- या पुस्तकात जागोजागी इंग्रजीचा वापर केला आहे,
हरकत असल्यास पुढे वाचण्यात वेळ वाया घालू नये.



Life is really simple, but we insist on making it complicated.

**- Confucius**

# अर्पण

एका ‘असत्या’स
ज्याने लपायला एक जागा दिली

-o-o-o-

# ८.२५ पंच इन

कॉलेजमध्ये माझं पहिलं लेक्चर
रोज लेट व्हायचं अगदी ठरल्यासारखं

इथे मात्र सगळं अगदी वेगळं
गणित आहे प्रत्येक सेकंदाचं मिनीटाचं

इथला प्रत्येकजण या घड्याळाच्या वेळेशी
बांधला गेलाय ..
कुणी जाणून बुजून तर कुणी अजाणतेपणी

या जगातली सर्वात महागडी गोष्ट
काय असेल? तर तो म्हणजे एखाद्याचा वेळ

तोच तर लिमीटेड आहे सगळ्यांकडे
त्या वेळेत आपण काय घडवू शकतो
यावर आपली किंमत ठरते

-०-०-०-

## जित्या ..

जित्या आमच्या
औफिसमधला
सर्वात बिलंदर माणूस
तिस-या क्युबिकल मधे बसायचा

त्याचं क्युबिकल म्हणजे
एकदम हैपनिंग प्लेस
रोज काहीतरी नवीन
कधी पिकनिकची प्लॅनिंग
कधी कुणाचा बर्थडे बॅश
हा सगळ्यात पुढे

डेडलाईन्स सुद्धा सांभाळायचा
सगळे म्हणायचे
"जित्या आहे डोन्ट वरी"

मात्र ५.३० झाले की घरी पळायचा
आयुष्यातला १ मिनीटही
वाया घालवायचा नाही म्हणायचा

तो दिवसच वेगळा होता
कुणाचा तरी फ़ोन आला
ऐकताना त्याचा चेहरा
पांढराफ़टक पडला

कितीतरी वेळ
कॉन्फ़रन्स रूम मधे जाऊन
एकटाच रडत होता
त्या दिवशी २ वाजताच निघून
गेला

आता रोज १०-११ वाजेपर्यंत
औफ़िसमधेच असतो म्हणे
.
.
.
.
आई गेल्यापासून घरी जाववत
नाही म्हणतो..

-0-0-0-

# क्युबिकल नंबर ७

मला आणि शेख्याला
शेवटचं क्युबिकल मिळालेलं
सात नंबरचं

सगळे भारी जळायचे आमच्यावर
बॉस पासून लंब होतं बरच आणि
आमचे स्क्रीन्स ही नाही दिसायचे कुणाला

आमच्या टेबलवरचा फ़ोन
नेहमी वाजायचा
" क्रिकेटचा स्कोर, शेयर मार्केट
इलेक्शन न्युज " विचारायला
प्लीज म्हणाले की काम व्हायचं ना!

त्यावर्षी त्याची ईद
आणि माझी दिवाळी
ऑफ़िसातच गेली...

-0-0-0-

# ड्रीम्स

४ नंबर मधला सुरज
एका प्रोजेक्ट मधे
माझ्या बरोबर काम करायचा
तेंव्हाची गोष्ट

काही ड्रॉइंग्ज झाली नाही
म्हणून मी त्याच्यावर जाम भडकलो
त्याला खूप सुनवलं होतं
त्याच्या फ़्युचरबद्दल..
त्याच्या ड्रीम्स बाबत

दुस-या दिवशी हाताच्या
बोटांना पट्ट्या बांधून
काम करत होता...वेगात

वैजू ने सांगितलं
"रोज ४-४ तास गिटारची प्रॅक्टीस करतो
गिटारिस्ट व्हायचं स्वप्न आहे त्याचं
कधी कधी बोटं कापली सुद्धा जातात त्याची"
आणि जाणवलं..
मीच विसरतोय माझी स्वप्नं.. माझं भविष्य

-0-0-0-

# सेंड ऑफ़

बौस ने आज
सगळ्यांना एकत्र बोलवलं
कुणीतरी म्हणालं
" वाडकर रिटायर होताहेत"

गेली २७ वर्षं हा माणूस
एक नंबर मध्ये टिकून होता
खर तर तेंव्हा क्युबिकल्सच नव्हती म्हणे

क्युबिकल्स झाल्यापासून
कलिग्ज आले आणि मित्र हरवले म्हणायचा
काहीतरीच वाटायचं..

त्या दिवशी जाणवलं
.
.
त्या दिवशी प्रत्येकजण त्यांच्या कामाविषयीच बोलला
त्यांच्यातल्या मैत्रीवर कुणीच बोलला नाही...!

-0-0-0-

# मरीन ड्राईव्ह ..

शेख्या नवीन होता मुंबईत
नागपूर हून आलेला..
त्याला मुंबई बघायची होती
मी सांगीतलं मरीन ड्राइव्ह पहाच..

समुद्र काय असतो ते कळतं
मनातल्या विचारांच्या गुंत्यांना
मोकळं करणारा समुद्र..
सुख दुःखांसारखा जवळ येणारा
दूर जाणारा समुद्र

दूस-या दिवशी मी विचारलं
काय पाहिलंस..

हमसून हमसून रडला
म्हणाला..

" दोस्त वहांपे समंदर तो नही
मगर पुलिसवाला मिला "

-0-0-0-

# प्राजी

शेजारच्या क्युबिकल मधे
परबजीत बसायचा
हट्टा कट्टा सरदार
आम्ही त्याला प्राजी म्हणायचो

महत्वाकांक्षी आणि हुशार होता
काही लोक त्याला सरदार'जी' म्हणायचे
त्याला त्यातला उपरोध कळायचा नाही..
की..

स्पेनमधल्या नवीन प्लांट
वर ट्रांस्फ़र झाल्यावर
जाताना मात्र तो बोलला
न बोलताही
' जी माने जीनियस '

-0-0-0-

# अदिदास ते नायके

"NoThinG is ImpoSSibLe "
त्या अदिदासच्या ॲडव्हर्टाईजची
टॅग लाईन म्हणूनच छान वाटतं ते...

बॉसच्या केबिनमधून बाहेर पडताना
संज्या बडबडत होता..

खरंतर ही ओळ संजयची सर्वात आवडती
आजवर केलेलं प्रत्येक काम त्याची पावती
त्याच्या क्युबिकल मधलं सचिनचं ते पोस्टर...

पण, हे सगळं त्याच्या लग्नाआधीचं

आता त्याच्या क्युबिकलमधल्या
सचिनची जागा नायके च्या युवी ने घेतलीय..

"JuSt dO iT "

-0-0-0-

# हाऊ आर यु !!

शाली..

.

औफ़िसमधे चार पाचच मुली

त्यात ही सर्वात स्मार्ट

टीप-टॉप रहायची

नेहमी इंग्रजीत बोलायचा प्रयत्न करायची

फ़क्त हाईटमध्ये मार खायची

हाय हिल्स घालूनसुद्धा..

सी-लिंक च्या कामासाठी

बांद्र्याला गेलो

तेंव्हा तिला बैंड स्टैंड ला पाहिली

एकटी नव्हतीच...तडकलोच..

पुन्हा विचार आला.. का तडकलो ????

-0-0-0-

# call centre

क्युबिकल नं १०
call centre म्हणूनच ओळखलं जायचं
अत्रे मॅडम all time फ़ोनवर बिझी

फ़ोन तरी काय?
कधी मुलांचा अभ्यास, कधी रेसीपीज..

एकदातर कुठल्याश्या
लॉ फ़र्मचा फ़ोन होता, तीन तास..

मी मजेत विचारलं
" जॉब प्रोफ़ाईल चेंज करताय की काय ?"
म्हणाल्या
.
" It is difficult for woman to be a single parent "
-0-0-0-

# लंच

मी शेख्या आणि अज्या
दुपारचं लंच एकत्रच घ्यायचो
पहिल्यांदा मजबुरी, तिघंही बॅचलर...
नंतर मात्र रिवाजच झाला
खरतर कॅंटीनच्या जेवणापेक्षा
अज्याच्या फ़िलौसॉफ़ीज टेस्टी असायच्या

एकदा म्हणाला
" कोणतीही गोष्ट मिळवायची असेल ना तर
ती टाळायचा प्रयत्न करावा .. ती गोष्ट आपोआप मिळते ..
आणि कोणतीही गोष्ट मिळवायचा प्रयत्न केलात..
तर ती कधीच मिळत नाही "

जरासा थांबला , म्हणाला
" दुःखाचं बरोबर उलट आहे.. "
त्या दिवशी जेवण जरा कडवटच लागलं

-0-0-0-

# कबुतर ...

माझ्या क्युबिकलच्या बाजूला
एक खिडकी आहे
AC चालू असला की ती बंद असते

एका सोमवारी एक कबुतर
त्या खिडकी बाहेर फ़िरत होतं

पुढे मागे फ़िरायचं..
काचेवर चोच मारायचं
पुन्हा तेच..
असं त्याचं बराच वेळ चालू होतं

मला वाटलं
त्याला त्यात मजा येतीय़
परंतू हळू हळू काचेवरचे टोचे
जोरजोरात होत होते
गुटूर-गुटूर सुद्धा जोरात सुरु झालं

मी शेवटी खिडकी उघडली
ते झटक्यात आत शिरलं
बावरल्या सारखं इकडून तिकडं
पंख फ़डफ़डत उडत होतं

क्लिनिंग स्टाफ़ मधला जौनी
त्याला हाकलायला धावला
खाली बसलेले सगळेच ओरडू लागले

बिचा-याला घाबरल्यासारखं झालं
एका कोप-यात जाऊन बसलं
निघेचना..

मनात विचार आला..
" अरे आपल्यात आणि त्या कबुतरात
फ़रक काय ?"
.
.
.
त्याला बिचा-याला कवितासुद्धा करता
येत नाहीत...

-0-0-0-

# अज्या

वैजू ने जॉब सोडला
.
मी आल्या-आल्याच
मिनू माझ्याकडे धावत आली
म्हणाली
" तू तरी समजाव ना तिला
तुझं ऐकेल ती..."

मला ठाऊक होतं
माझ्या हातात काहीच नव्हतं
उगाच म्हणालो तिला
"बघतो "
तसही दुसरं काय करणार होतो..

जाताना ती सर्वांना भेटली
तशी मलाही भेटली
म्हणाली
" त्याला सांभाळ "

.
.
त्या दिवशी लंचमधे
अज्याने त्याची शेवटची फ़िलोसौफ़ी
सांगीतली

" माणूस मरेपर्यंत जगण्यासाठी जन्माला
येतो
हे त्याला ब-याच उशीरा कळतं "

-0-0-0-

# गॅप

आज जवळपास महिनाभराच्या
सुट्टीनंतर ऑफ़िसात आलो होतो

येताना रस्त्यातच जौनी भेटला
मी गेल्यावर रिनोव्हेट झाल्याचं सांगत होता
औफ़िस एकदम पौश केलय म्हणाला

आपोआप उघडणारी काचेची दारं..
महागडी कॉफ़ी मशिन,
भिंतीवरचे फ़्लॅट स्क्रीन्स
या सगळ्यांना जवळ जवळ ओलांडतच आत शिरलो..

जी भिती वाटली होती तेच नेमकं दिसलं
.
.
.
क्युबिकल्सच्या भिंतींची उंची वाढवली होती...

-0-0-0-

# पाणी

शेख्याला यायला
जरा उशीरच झाला आज
साहेबांनी त्याला आत बोलावला

कारण विचारल्यावर
पाणी थोडं उशीरा आलं म्हणाला
'असली क्षुल्लक कारणं सांगायला
लाज वाटत नाही ...' साहेबांचा रिमार्क
.
.
.
.
त्या दिवशी नोटीस बोर्डावर
नोटीस होती
.
.
" Please flush the toilets after use - By order"

-0-0-0-

# दिवाळी

गेल्या वर्षभरात बरेच
प्रोजेक्ट्स ऑनटाईम झाले होते.
डिपार्टमेंटचे प्रोग्रेस रिपोर्टस सुद्धा
लक्षणीय होते

या वर्षीची दिवाळी
धुमधडाक्यात जाणार
सगळेच अगदी खुष होते

विन्या मात्र एकटाच
तोंड पाडून बसला होता
अमेरिकेतली कुठलीशी बँक
बुडाल्याचं सांगत होता

अज्या जवळ जवळ ओरडलाच
"तिकडे कशाला इन्व्हेस्टमेंट केलीस ?"
विन्याला डोळ्यातले अश्रु आवरेना
म्हणाला
" आपल्या कंपनीची होती रे...."

-0-0-0-

# पॉप-अप

“

First 50% of project work takes
80% time
........ and rest takes another
80% “

कालच्या टूलबौक्स मीटींग मध्ये
प्रोजेक्ट मैनेजर चड्डा फ़ारच खवळला होता
कॉन्फ़रन्स, ई-मेल्स, फ़ोनकॉल्स अशा
फ़ालतू गोष्टीत वेळ वाया घालवण्याचे
परिणाम सांगत होता

डोक्यात अशी सणक शिरलेली माझ्या..
एकतर या लोकांच्या वेळेच्या कमिटमेंट्स
अव्वाच्या सव्वा.. त्या ही झेलायच्या
आणि वरून असलं ऐकायचं..

पण करणार काय निमूटपणे कामाला
लागलो..

प्रोसेस टॉवर चं डिझाईन संपत आलं होतं
तिस-या मॉड्यूलमधले काही मेंबर्स
अजूनही फ़ेल होत होते..

तितक्यात पौप-अप आला
“You got 1 new mail in
your inbox”
डोळ्यासमोर चड्डा उभा राहिला..
म्हटलं “ मरूदे ...”
आणि पुन्हा त्या फ़ेल मेंबर्सच्या पाठी
लागलो

त्या दिवशी संध्याकाळी सुरज भेटला
म्हणाला
“ “अरे एक वाईट बातमी आहे..
चड्डाचा ॲक्सीडेंट मध्ये मृत्यू झाला
त्यांना डोनर मिळाला नाही.
O -ve वाल्यांना मेल केलेला दुपारी..

तुझ्या ब्लड ग्रुप कोणता ?””
-0-0-0-

# नशिब

दस-याला आमच्या बिझनेस युनिटचा हेड
सर्वांशी हात मिळवायला येणार होता

विन्याचा तर रोलमौडेल होता तो
ही तर त्याच्यासाठी पर्वणीच होती

पण म्हणतात ना..
'जिथं नशिबच गांडू..
तिथं काय करणार पांडू'

बिचा-याचा उजवा हातच
मोडला होता

तरीही विन्या दस-याला आलाच
दुस-या दिवशी अख्ख्या कंपनीत
बातमी होती..
.
.
.
" राघवन साहेबांनी विन्याला मिठी मारली..."
नशिबच असतं..
-0-0-0-

# महागाई

"या महिन्यापासून आपला DA वाढवतायत !"
संज्या ने सकाळीच न्यूज आणली

आणि सर्वांना पुन्हा जाणीव झाली
महागाई वाढल्याची

चित्रे मॅडमच्या मुलांच्या ट्युशन फ़ीज
अज्याच्या बाईकचं पेट्रोल
शालीची कॉस्मेटीक्स
संज्याच्या क्रेडीट कार्डाचे EMI
सगळंकाही आटोक्यात येणार होतं
.
.
.
"तुरदाळ स्वस्त झाली का ?"
तुक्या विचारत होता...

-0-0-0-

# कंडीशन्स अप्लाय..

माझ्या क्युबिकलचा दुसरा ड्रॉवर
काट्यासारखा टोचत होता मला

क्रेडीट कार्ड ची चूकीची बिलं
ती न भरल्याबद्दल आलेल्या
कोर्टाच्या नोटीस
पोस्टपेड कनेक्शन बंद करूनही
दर महिन्याला न चुकता येणारी त्याची बिलं

आणि या सर्वांच्यावर अगदी ताजं
डिफ़ॉल्टर म्हणून
होमलोन नाकारल्याचं लेटर

अज्या म्हणाल्याचं आठवत होतं
"फ़ुकटात मिळणा-या गोष्टीसाठीच
सर्वात मोठी किंमत मोजावी लागते"

-0-0-0

# शालन..

टाक टूक टाक टूक
शाली आली की
तिच्या हाय हिल्स
ओरडून सांगायच्या

जवळ जवळ सगळेच
आपापल्या क्युबिकलमधून
डोकावून पहायचे

पण त्या दिवशी
जणू शालीचं
अस्तित्वच जाणवलं नाही

कुणा शालन पाटील च्या नावावर
'इन-आऊट' च्या वेळा मात्र होत्या

आज एका व्यक्तीमत्वाचीच
निर्घृण हत्या करण्यात आली होती

त्याचा पुरावा माझ्या टेबलावर होता
'शुभ विवाह' मथळ्याखाली...
-0-0-0-

# सोप्पं !

आज कॉफ़ी मशिन काम करत नव्हती
दोन दिवस झाले AC
अधून मधून बंद पडायचा
कॅंटीनच्या जेवणातली
स्वीट डिशही 'लिमीटेड' झालेली

मार्केट बसल्याचा फटका
जवळपास सर्वांनाच बसला
काहींना प्रत्यक्षपणे
तर काहींना अप्रत्यक्षपणे

विन्याने तर मिळालेला पुरा बोनस
तेजीत चाललेल्या बाजारात टाकला होता
आज डोकं धरण्यावाचून पर्यायच नव्हता..

अश्क्या म्हणाला त्याला..
" सोप्पं असतं रे..
पुन्हा सुरुवात करायची.."

-0-0-0-

# सोप्पं ??

अशक्या बोलण्यात हुशार
'फ़ाड फ़ाड इंग्रजी'
बोलणा-यालापण लोळवायचा

आमच्या बॉसचा फ़ेव्हरीट
पाच वर्ष त्याने बॉसची 'मर्जी' सांभाळली
यावर्षी त्याचं प्रमोशन फ़िक्सच होतं

पण..

'साहेबाची ट्रान्सफ़र झाली'

खरंच सोप्पं असतं..?
पुन्हा ? सुरुवात करायची..

-0-0-0-

# संज्या..

संज्याला लहानपणी
पायलट व्हायचं होतं

संज्याची आई
ॲडव्होकेट होती
वडिलांची टौवेल फ़ैक्टरी होती
मामा आमदार होता

संज्या मात्र
'इंजिनियर' झाला

संज्याला पाहीलं की अज्याची ओळ
सारखी आठवते

“ संज्याची रम्मी कधीच नाही व्हायची
.. त्याच्या पत्त्यात जोकर्स जरा जास्तच येतात ”

-0-0-0-

ई साहित्य प्रतिष्ठान

नवीन काळाच्या नव्या खुणांना घेऊन आले आहेत नवीन साहित्यिक
त्यांचा नव्या वाचकांशी संवाद घडवून आणतंय
ई साहित्य प्रतिष्ठान
पाच वर्षांत , तिनेकशे पुस्तकं, आपल्या दिडेक लाख वाचकांपर्यंत
शून्य पैशांत घेऊन जाणारं ई साहित्य प्रतिष्ठान
मराठी साहित्यात काही नवे प्रयोग घडवून आणतं आहे.

तुमचं कॉंट्रीब्युशन हवंय
तुमच्या आप्तमित्रांचे मेल आयडी ... दहा ... बारा
जमतील तसे.

esahity@gmail.com

पाठवताय ना?

www.esahity.com